## वेचक

### वाडा-मनोर महामार्गाची दुरवस्था

**वाडा :** वाडा-भिवंडी-मनोर महामार्गाच्या एका बाजूचे काम सुरू असल्याने सध्या एकेरी मार्गाने वाहतूक सुरू आहे. मात्र, महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने तसेच धुळीचे साम्राज्य निर्माण झाल्याने वाहनचालक आणि प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या मार्गावरून दररोज हजारो दुचाकीस्वार आणि प्रवासी ये-जा करतात. रस्त्यावरील धुळीमुळे वाहनचालकांना समोरचे दिसण्यात अडथळा निर्माण होत असून अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच धुळीमुळे डोळे, नाक आणि घशाचा त्रास होत आहे. महामार्गाच्या दुरवस्थेबाबत नागरिकांकडून संबंधित बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करण्यात येत असून, रस्ता वाहतुकीस योग्य करण्याची मागणी होत आहे. "वाहनचालक व प्रवाशांच्या आरोग्याचा विचार करून महामार्गावरील धुळीची समस्या दूर करण्यासाठी शासनस्तरावरून संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे," अशी मागणी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष प्रफुल पाटील यांनी केली.

### सरतोडीत ३०० देशी वृक्षांची लागवड

**सफाळे :** पर्यावरण संवर्धनासह लोकसहभागातून वृक्षसंवर्धनाला चालना देण्यासाठी ग्रामपंचायत उंबरपाडा-सफाळे विभागाच्या वतीने सेवा संकल्प अभियानांतर्गत सरतोडी येथे रविवारी वृक्षारोपण करण्यात आले. सरतोडी



परिसरातील डोंगरी भागात सुमारे ३०० देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी लाल रक्तचंदन, अर्जुन, बेहडा, मोह आदी स्थानिक वातावरणाशी सुसंगत प्रजातींची लागवड करण्यात आली. लागवड केलेली झाडे जगविण्याची जबाबदारी ग्रामस्थांनी स्वीकारली असून, ग्रामपंचायतीकडून पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. ग्रामस्थ आळीपाळीने रोपांना पाणी देणार आहेत. वृक्षलागवडीमुळे जमिनीची धूप रोखण्यासह पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. त्यामुळे वृक्षसंवर्धनासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले. महिला आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला. यावेळी सरपंच तनुजा कवळी, उपसरपंच राजेश म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य स्नेहा जाधव, अमोद जाधव, पेसा अध्यक्ष भरत जाधव, पेसा सदस्य अविनाश जाधव यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी आणि सरतोडीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

### कोतवाल पदांच्या भरतीसाठी आज आरक्षण सोडत

**विक्रमगड :** पालघर जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये कोतवाल संवर्गातील एकूण १२३ रिक्त पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. विक्रमगड तालुक्यातील कोतवाल संवर्गातील रिक्त पदांसाठी सजा निहाय आरक्षण सोडत सोमवार, २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता विक्रमगड पंचायत समिती येथे आयोजित करण्यात आली आहे. या सोडतीद्वारे उपलब्ध रिक्त पदांचे आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे. भरती प्रक्रियेतील आरक्षण सोडत पारदर्शक पद्धतीने पार पडावी, यासाठी इच्छुक नागरिकांनी या सोडतीस उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार मयूर चव्हाण यांनी केले.

# कंत्राटदाराचा घोळ पालिकेच्या मुळावर!

## आर्थिक गुन्हे शाखेकडून रनिंग बिलांपासून जीपीएसपर्यंत सखोल चौकशी

◆ **विरार (प्रतिनिधी):**

भाईंदरपाडा, वालीव येथील क्षेपणभूमीवरील कचरा व्यवस्थापनाच्या कामातील गैरव्यवहाराच्या तपासाने आता महापालिका प्रशासनाचीच कोंडी केली आहे. बोळींज पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविल्यानंतर कंत्राटदाराच्या कामापासून प्रत्यक्ष पाहणी, वाहतूक, आरडीएफ विल्हेवाट, जीपीएस नोंदी आणि डिसेंबर २०२३ पासूनची रनिंग बिले अशा अनेक बाबींची सविस्तर कागदपत्रे पोलिसांकडून मागविण्यात आली आहेत. त्यामुळे कंत्राटदाराकडून काम करून घेणे आणि त्यानंतर बिले मंजूर करण्याच्या प्रक्रियेत नेमकी कोणाची भूमिका होती, याचा हिशेब आता प्रशासनाला तपास यंत्रणेसमोर मांडावा लागणार आहे.

क्षेपण भूमीवरील कचरा व्यवस्थापनाच्या प्रकरणात बोळींज पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४७४/२०२६ दाखल करण्यात आला असून, भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१६(५), ३१६(२), ३१८(३), ३३६(३), ३४०(२), २१२ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल आहे. हिंदकुमार श्रीकांत यादव तसेच अझहरुद्दीन वशीर सय्यद यांच्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे असून, सहाय्यक पोलीस आयुक्त गोडूराम बांगर यांनी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या उपायुक्तांकडे संबंधित कागदपत्रांची मागणी केली आहे. भाईंदरपाडा, वालीव येथील क्षेपणभूमीवर १५ डिसेंबर २०२३ रोजी 'साई युटिलिटी कॉन्ट्रॅक्टर्स' या कंपनीशी करण्यात आलेल्या कंत्राटातील प्रोजेक्ट इंजिनिअरचे नाव, मोबाईल क्रमांक आणि त्याने सादर केलेल्या अहवालाची प्रत पोलिसांनी मागवली आहे.

तसेच कंत्राटाच्या कामावर देखरेख करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची नावे, पदे व मोबाईल क्रमांक, डिसेंबर २०२३ पासून आजपर्यंत काम करणाऱ्या सर्व कामगारांची यादी, कचरा वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली वाहने, त्यांचे चालक, कंत्राटदार आणि ट्रान्सपोर्टर यांची माहिती तसेच वाहनांच्या नोंदणी प्रमाणपत्रांच्या प्रतीही तपास यंत्रणेने मागितल्या आहेत.

त्याचप्रमाणे क्षेपणभूमीवर प्रक्रिया करण्यात आलेल्या आरडीएफची वाहतूक कुणाच्या जबाबदारीवर करण्यात आली, त्याची संपूर्ण माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. 'टेंडर सोल्युशन' कंपनीची माहिती तसेच साई युटिलिटीशी संबंधित अहवालही मागविण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने भाईंदरपाडा क्षेपणभूमीची पाहणी केली असल्यास त्याचा अहवाल आणि कंत्राटानुसार प्रत्यक्षात किती काम झाले, याची माहितीही आर्थिक गुन्हे शाखेला सादर करावी लागणार आहे.



### कंत्राटदाराचा घोळ निस्तरताना प्रशासनाची कोंडी

एकंदरीतच आर्थिक गुन्हे शाखेने मागविलेली माहिती अत्यंत सविस्तर असल्याने ती एकत्रित करून देताना महापालिका प्रशासनाची मोठी कसरत होत आहे. कंत्राटदाराकडून कंत्राटातील कामे करून घेणे, त्याची प्रत्यक्ष पाहणी करणे, कामाची पडताळणी करूनच बिले मंजूर करणे ही प्रशासनाची जबाबदारी असते. मात्र, याच कामासंदर्भात गुन्हा दाखल झाल्यानंतर आता कंत्राटाची अंमलबजावणी, देखरेख आणि देयक मंजुरीची संपूर्ण प्रक्रिया तपास यंत्रणेच्या कक्षेत आली आहे. त्यामुळे कंत्राटदाराच्या कामाचा घोळ निस्तरताना आता संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून कोणत्या आधारावर कामाची पाहणी व बिले मंजूर करण्यात आली, याचे स्पष्टीकरण देण्याची वेळ आली आहे. पोलिसांनी मागितलेली माहिती तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश असतानाही कागदपत्रे संकलित करण्यासाठी प्रशासनाला विलंब होत असल्याचे चित्र आहे. भाईंदरपाडा, वालीव येथील कचरा टाकण्यात येणाऱ्या जागेची संपूर्ण माहितीही पोलिसांनी मागवली आहे. त्यामुळे या प्रकरणातील तपास आता केवळ कंत्राटदाराच्या कामापुरता मर्यादित न राहता कंत्राट प्रक्रिया, प्रत्यक्ष काम, देखरेख, वाहतूक, आरडीएफ विल्हेवाट आणि देयक मंजुरीपर्यंत पोहोचला आहे.

### रनिंग बिलांवरही नजर

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे डिसेंबर २०२३ पासून आजपर्यंतची रनिंग बिले. कंत्राटानुसार बिल मंजूर करण्याची प्रक्रिया काय होती, बिल मंजूर करण्यापूर्वी कोणत्या अधिकाऱ्यांनी तपासणी केली, प्रत्यक्ष कामाची पडताळणी कशी करण्यात आली आणि कंत्राटदाराला कोणत्या आधारावर देयके मंजूर करण्यात आली, यासंबंधीची कागदपत्रेही पोलिसांनी मागवली आहेत. कचरा व्यवस्थापन आणि आरडीएफ विल्हेवाटीबाबतची शासकीय नियमावली, एसओपी, क्षेपणभूमीवरील वाहनांना बसविण्यात आलेल्या जीपीएस यंत्रणेची माहिती आणि कंत्राटदाराला कोणत्या माध्यमातून देयके करण्यात आली, याचाही तपास केला जाणार आहे.

# जिल्ह्यात आजपासून कुष्ठरोग शोध मोहीम

## कुष्ठरोग निर्मूलनासाठी घराघरांत तपासणी



◆ **पालघर (प्रतिनिधी) :**

कुष्ठरोगाचे लवकर निदान, त्वरित उपचार आणि रोगाचा प्रसार रोखण्यासाठी पालघर जिल्ह्यात २८ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम राबविण्यात येणार आहे.

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेच्या तयारीचा आढावा २४ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद पालघर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय पथकांचे नियोजन, घरभेटी, संशयित रुग्णांचा शोध, संपर्कातील व्यक्तींचे सर्वेक्षण, रुग्णांची नोंदणी तसेच उपचार व्यवस्थेचा आढावा यावेळी घेण्यात आला. त्वचेवर संवेदना कमी झालेला किंवा मुंग्या येणे, शरीराच्या एखाद्या भागातील संवेदना कमी होणे, हात-पायांना बधिरपणा अशी लक्षणे आढळल्यास संबंधित नागरिकांची तपासणी करण्यात येणार आहे. कुष्ठरोग हा उपचाराने पूर्णपणे बरा होणारा आजार असल्याने नागरिकांनी गैरसमज व सामाजिक कलंक दूर करून आरोग्य विभागाच्या पथकांना सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. अशोक गवळी यांनी केले. बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी आदी उपस्थित होते.

### वसई-विरारमध्ये ३३२ आरोग्य पथकांची नियुक्ती

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात २८ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत ३३२ आरोग्य पथकांमार्फत घराघरांत जाऊन नागरिकांची तपासणी करण्यात येणार आहे. महापौर अजीव पाटील, आयुक्त पृथ्वीराज बी.पी. तसेच आरोग्य समिती सभापती निलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांच्या नेतृत्वाखाली अभियान राबविण्यात येणार आहे. शहर क्षयरोग व कुष्ठरोग अधिकारी राजेश चौहान आणि सहाय्यक संचालक आरोग्यसेवा (कुष्ठरोग), पालघर डॉ. अशोक गवळी यांच्या समन्वयाने अभियानाची अंमलबजावणी केली जाणार आहे. नियुक्त पथके नागरिकांच्या घरी भेट देऊन कुष्ठरोगाच्या संभाव्य लक्षणांची माहिती घेणार आहेत. त्वचेवर संवेदना कमी झालेला किंवा बधिर डाग, त्वचेच्या रंगात बदल, हात-पायांना बधिरपणा अथवा मुंग्या येणे, नस जाड होणे तसेच हात-पायांच्या हालचालीत कमजोरी अशी लक्षणे आढळल्यास पुढील वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे.

# ई-केवायसी पूर्ण करा, अन्यथा रेशनचे धान्य बंद

## जिल्ह्यात ३ लाख ६० हजार लाभार्थी अद्याप प्रलंबित

◆ **पालघर (प्रतिनिधी) :**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील शिधापत्रिकाधारकांची अचूक ओळख पटवून रेशन धान्य वितरणात पारदर्शकता आणण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. पालघर जिल्ह्यात अद्याप ३ लाख ५९ हजार १२१ लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रलंबित असून, ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी आता केवळ तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. ३० सप्टेंबर ही अंतिम मुदत असून, त्यापूर्वी संबंधित लाभार्थ्यांनी ई-केवायसी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा कार्यालयाने केले आहे. मुदतीत ई-केवायसी न केल्यास मिळणारे रेशनचे धान्य बंद होण्याची शक्यता आहे.

पालघर जिल्ह्यात ई-केवायसीचे आतापर्यंत सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. जिल्ह्यासाठी एकूण १७ लाख ९५ हजार ७२९ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी १४ लाख ३६ हजार ६०८ लाभार्थ्यांची ई-केवायसी यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. मात्र, अजूनही मोठ्या संख्येने लाभार्थ्यांची प्रक्रिया बाकी असल्याने प्रशासनाकडून अंतिम मुदतीपूर्वी ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी जनजागृती केली जात आहे. तालुकानिहाय प्रलंबित ई-केवायसीमध्ये वसई तालुक्यात १ लाख ३ हजार ६४३, पालघरमध्ये ५७ हजार ४३५, डहाणूमध्ये ६९ हजार ३९३, तलासरीमध्ये २२ हजार ६२६, वाड्यात ३१ हजार ८०९, विक्रमगडमध्ये २३ हजार ५९२, मोखाड्यात १८ हजार ८५१, तर जव्हार तालुक्यातील ३१ हजार ७७२ लाभार्थ्यांची ई-केवायसी अद्याप बाकी आहे. ई-केवायसी प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांची यादी संबंधित गावातील रास्तभाव धान्य दुकानदारांकडे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

त्यामुळे नागरिकांनी आधार कार्डासह आपल्या रेशन दुकानदाराशी संपर्क साधून तातडीने ई-केवायसी पूर्ण करावी. रेशन दुकानातील ई-पॉस मशीनवर बायोमेट्रिक अंगठ्याचा ठसा देऊन ही प्रक्रिया पूर्ण करता येते, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

### घरबसल्या ई-केवायसीची सुविधा

लाभार्थ्यांना घरबसल्या ई-केवायसी करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. मोबाईलच्या प्ले स्टोअरवरून 'MERA e-KYC' किंवा 'Face eKYC' अप डाउनलोड करून नागरिक स्वतःची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करू शकतात. त्यामुळे आता अंतिम मुदतीला केवळ तीन दिवस शिल्लक असल्याने लाभार्थ्यांनी प्राधान्याने ई-केवायसी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सीमा महल्ले यांनी केले आहे.



### दुर्वेसमध्ये वाघ असल्याची अफवा

**मनोर :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील पालघर तालुक्यातील दुर्वेस गावातील चाचू पाडा परिसरात पट्टेरी वाघ दिसल्याची माहिती समाज माध्यमांवर प्रसारित झाली. मात्र, पट्टेरी वाघ दिसल्याची कोणतीही अधिकृत माहिती वनविभागाला मिळालेली नसून, समाज माध्यमांवरील माहिती अफवा असल्याचे वनविभागाने स्पष्ट केले आहे. दहिसर वनपरीक्षेत्राचे वनक्षेत्रपाल हृषीकेश वाघमारे यांनी पालघर जिल्ह्यातील जंगलांमध्ये पट्टेरी वाघाचे वास्तव्य नसल्याचे सांगितले. परिसरात बिबट्यांचा वावर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. समाज माध्यमांवरील संदेशानंतर वनविभागाकडून दुर्वेस येथील संबंधित ठिकाणी पाहणी करण्यात येणार आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता कोणताही वन्यप्राणी आढळल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन वनविभागाने केले आहे. दुर्वेस परिसरात यापूर्वी बिबट्याच्या हालचाली आढळल्याने नागरिकांमध्ये सतर्कता वाढली आहे.

### 'आमदार मॅरेथॉन'ला १,५०० धावपटूंचा सहभाग

**डहाणू :** डहाणू-तलासरी परिसरातील युवकांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्यासह ग्रामीण आणि आदिवासी भागातील होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित 'आमदार मॅरेथॉन'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. डहाणू आणि तलासरी तालुका कला-क्रीडा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आणि ट्रायबल चॅरिटेबल ट्रस्ट, डहाणू यांच्या आयोजनातून तसेच डहाणू विधानसभा मतदारसंघाचे आमदार कॉ. विनोद निकोले यांच्या नेतृत्वाखाली ही भव्य मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत तब्बल १ हजार ५०० धावपटूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत खुल्या गटातील मुला-मुलींसाठी ५ किलोमीटर, १७ वर्षांखालील मुला-मुलींसाठी ३ किलोमीटर, तर १४ वर्षांखालील मुला-मुलींसाठी २ किलोमीटर अंतराच्या स्पर्धा घेण्यात आल्या. ग्रामीण व आदिवासी भागातील खेळाडूंना स्पर्धात्मक व्यासपीठ मिळावे तसेच आरोग्य, व्यायाम आणि शारीरिक तंदुरुस्तीबाबत जनजागृती व्हावी, हा या उपक्रमाचा उद्देश होता. मॅरेथॉनच्या आयोजनासाठी आयोजक, पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रीडा क्षेत्रातील व्यक्ती आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.


## जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर यांचे कार्यालय

**- जाहिर नोटीस -**

**विशाल जुन्नर सहकारी पतपेढी मर्या. मुंबई वाशी, शाखा ता. जुन्नर, जि. पुणे** या संस्थेने कर्जदारांच्या थकबाकीपोटी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील कलम १०१ अन्वये मिळविलेल्या वसुली प्रमाणपत्राचे आधारे कार्यवाही केल्यानंतर जप्त केलेल्या मालमत्तेचे अपसेट प्राईज मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे दाखल केलेले असून त्या अनुषंगाने संस्थेचे कर्जदार/जामीनदार यांना सुनावणी नोटीस रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आल्या होत्या व या कार्यालयामध्ये दिनांक १३/०८/२०२६, २७/०८/२०२६, ०३/०९/२०२६ व २४/०९/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आलेली असून सुनावणीचे सुनावणी नोटीस लागू झाल्याबाबत पोहच पावत्या अगर नोटीसा प्राप्त न झाल्याने त्यांना जाहिर सुनावणी देण्याचा निर्णय घेण्यात आला. संस्थेचे खालील कर्जदार / जामीनदार गैरहजर राहिलेले असून संस्थेने जप्त केलेल्या मालमत्तेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | कर्जदाराचे नांव | गांव/पत्ता | कर्जाच्या अनुषांगाने जप्त केलेल्या मालमत्ता धारकाचे नांव | गांव/पत्ता | मिळकतीचे वर्णन: स.नं./गट नं. | मिळकतीचे वर्णन: क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. गवराम शंकर नवले | बी/५०२, भगवती ग्रीन फेज ए-२ टाईप ओनर्स सेन्ट्रल पार्क, इस्कॉन मंदिराजवळ, प्लॉट नं. ६, सेक्टर २३, खारघर-१० | श्री. गवराम शंकर नवले | भोंद्रे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर | ३६७/१/२ | ७७०० चौ.मि. |
| | | | | | ग्रा.मि.नं. २३६ | १०६०.०३ चौ.मि. |
| | | | | | ग्रा.मि.नं. २३६ | आरसीसी बांधकाम १०४/८९ चौ.मि. |

तेव्हा या जाहिर नोटीस अन्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सदर प्रकरणी म्हणणे मांडण्यासाठी त्यांनी **दिनांक ५/१०/२०२६ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर, सहकार महर्षी गोपाळरावजी सोले पाटील सहकार प्रशिक्षण केंद्र, चाहुराणा बु॥, मार्केट यार्ड मागे, अहिल्यानगर यांचे दालनात दुपारी ठिक १२ वाजता** समक्ष हजर रहावे. आपण सदर दिवशी हजर न राहिल्यास अथवा आपले लेखी/तोंडी म्हणणे सादर न केल्यास आपले काही एक म्हणणे नाही असे गृहीत धरुन मालमत्तेचे मूल्यांकन ठरवून देण्याची (अपसेट प्राईज विक्रीची) पुढील कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**मंगेश सुरवसे**
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था,
अहिल्यानगर

## कल्याण डोंबिवली डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

संगणक विभाग

ई-निविदा सुचना क्रमांक-०२/२०२६-२७

आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका खालील कामाकरीता नोंदणीकृत कंपनी किंवा भागीदारी संस्था किंवा संस्था यांचेकडून खालील कामांकरीता दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदेद्वारे अर्ज मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव / तपशिल | कोरे निविदा फॉर्म फी | निविदा अनामत रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | १०० नवीन प्रिंटर्सचा पुरवठा करणे. तसेच या नवीन आणि सध्याच्या प्रिंटर्सची ५ वर्षांसाठी देखभाल (मोफत) करणे आणि प्रिंटर्ससाठी सर्वोत्तम दरात टोनर्स उपलब्ध करून देणे. | रु. ३५४००/- (जी.एस.टी. सह) | रु २२५०००/- | ६० महिने |

**अटी व शर्तीः**

1. कामाची सविस्तर निविदा सुचना व कोरे निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.२८/०९/२०२६ ते दि.१२/१०/२०२६ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.
2. निविदा ई-टेंडरिंग कार्यप्रणालीव्दारे दि.२८/०९/२०२६ ते दि.१२/१०/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत भरता येतील.
3. निविदा शक्य झाल्यास रोजी दि.१३/१०/२०२६ रोजी दुपारी ३.१५ वाजता उघडण्यात येतील.
4. तथापि निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, क.डों.म.पा. यांनी राखून ठेवला आहे व त्यांचा निर्णय कायदेशीररित्या सर्व निविदा धारकांसाठी बंधनकारक राहील.

सही/-
**आयुक्त**, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

जा. क्र.: कडोंमपा/जसंवि / मुका / ४१८
दि. २४/०९/२०२६

## उज्जीवन स्मॉल फायनांस बँक

नोंदणीकृत कार्यालयः ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

### जाहीर लिलाव सूचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अ‍ॅसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना**

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

| अनु. क्र | कर्ज खाते क्र./ शाखा | कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव | १३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार | ताब्याचा दिनांक | राखीव मूल्य आयएनआर मध्ये/ इरठे आयएनआर मध्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 4411210130000533 / 4411- कोपरखैरणे | **१. विनायक हरिश्चंद्र सावंत, २. प्राजक्ता सावंत दोघांचा पत्ताः** जगन्नाथ कॉलनी, खोली क्र. एए चरण बाबा नगर, उल्हासनगर, ठाणे, महाराष्ट्र ४२१००४. अनु. क्र. १ येथे देखील : मायेहर अँड सन्स ४७ लतीफ हाऊस, ३ रा मजला, संत तुकाराम मार्ग, मस्जिद बंदर पूर्व, मुंबई, महाराष्ट्र ४०००९ | १८.०३.२०२४/ १३.०३.२०२४ अनुसार रु. १९०९४२८.५८/- | 09.10.2025 | Rs.12,13,000/- / Rs.1,21,300/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** नोंदणीकरण जिल्हा ठाणे आणि जिल्हा कल्याणचा उप जिल्हामधील कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीमधील गाव शिवाजीनगर, डोंबिवली (प), ता. कल्याण जिल्हा ठाणे येथील ११६० चौ. मी. मोजमाप असलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. १९, हिस्सा क्र. १३ ए वर बांधण्यात आलेल्या "श्री विठ्ठल कृपा" म्हणून ज्ञात असलेली इमारत, नवीन फायर ब्रिगेड ऑफिस समोर, सुभाष रोड, चिंचोडयाचा पाडा येथील ७ व्या मजल्यावरील २६२.५ चौ.फू. चटईक्षेत्र असलेली (सामाईक जागेसह) (म्हणजेच २४.३९ चौ. मी. चटईक्षेत्र) सदनिका क्र. ३०२. विनायक हरिश्चंद्र सावंत आणि पूजा विनायक सावंत ह्यांच्या मालकीची. | | | |
| 2 | 4419210130000351 / 4419- अंबरनाथ | **१.सुमित सुरेश थोरात, २. उज्वला सुमित थोरात, दोघे येथेः** खोली क्र. २, १ ला मजला, शिव शक्ती बिल्डींग, महात्मा फुले नगर, मोहने, आंबिवली पूर्व, कल्याण, ठाणे, महाराष्ट्र – ४२११०२. दोघे येथे देखीलः डी. एस. ससाणे चाळ, महात्मा फुले नगर, मोहने, आंबिवली पूर्व, कल्याण, ठाणे, महाराष्ट्र – ४२११०२. अनु. क्र. १ येथे देखील : सिक्युरिटी गार्डस बोर्ड, बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा डी ३०१, ई ३०१, सानपाडा रेल्वे कॉम्प्लेक्स, सानपाडा, नवी मुंबई, ठाणे महाराष्ट्र – ४००७०५. अनु. क्र. २ येथे देखीलः प्रतीक्षा कलेक्शन, गोटूतमल जतीन शॉप, मोहने बाजार पेठ, गामा मस्जिद रोड, आंबिवली पूर्व, ठाणे, महाराष्ट्र - ४२११०२ | ०५.०३.२०२५ / ०१.०३.२०२५ अनुसार रु. १३४२६६५.५७ | 13.01.2026 | Rs.6,60,000/- / Rs.66,000/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** नोंदणीकरण जिल्हा ठाणे आणि नोंदणीकरण उप जिल्हा कल्याण, ठाणे ४२११०२ मधील कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीमधील गाव मोहने, ता. कल्याण मधील कोकणे जनरल स्टोअर्स जवळ, फुले नगर, आंबिवली पूर्व येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. २२, हिस्सा क्र. ४/२/२ आणि सर्वे क्र. २२, हिस्सा क्र. ४/२/२ ए वर बांधण्यात आलेल्या 'साई सृष्टी संकुल' म्हणून ज्ञात इमारतीच्या तळ मजल्यावरील ३२६ चौ. फू. चटई क्षेत्रफळ असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ०४ चा सर्व खंड आणि भूखंड. मालमत्तेच्या सीमा पुढील प्रमाणे : पूर्वः खाजगी घर, पश्चिमः अंतर्गत रोड, उत्तरः खाजगी घर, दक्षिणः खाजगी घर, सुमित सुरेश थोरात आणि उज्वला सुमित थोरात ह्यांच्या मालकीचे. | | | |
| 3 | 4462210130000006 / 4462 - कामोठे | **१.रविंद्र एकनाथ कोथे, २ श्रीमती संध्या रवींद्र कोथे, दोघे येथे :** येथे राहणार देव्हाणे, खोपोली पाली रोड, देव्हाणे, ता. खालापूर, रायगड, महाराष्ट्र - ४१०२०३ | ०५.०८.२०२३ / ०१.०८.२०२३ अनुसार रु. १७२७६४९.२२ | 21.08.2025 | Rs.5,86,000/- / Rs.58,600/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** ग्रामपंचायत – तळोजा पंचानंदच्या हद्दीमधील गाव रलोजा पंचानंद, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथे बांधण्यात आलेल्या "सुविधा अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील ३९७ चौ. फू. (बिल्ट अप क्षेत्र) असलेल्या सदनिका क्र. १०९ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | |
| 4 | 4505210130000057 / 4505 - विरार | १. श्री. मोहम्मद अमीन गाझी, २. श्रीमती फातिमा फारुख गाझी दोघेही येथेः सदनिका क्र. ६, ११८, काशमारी बिल्डींग, निशाणपाडा रोड, डोंगरी, झमझम हॉटेल जवळ, मुंबई, महाराष्ट्र ४००००९ | ११.१०.२०२१/ २७.०९.२०२१ अनुसार रु. १६३३०९७.०० | 15.04.2023 | Rs.3,81,000/- / Rs.38,100/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** गाव सावरोली, (बुद्रुक), ता. शहापूर आणि जिल्हा ठाणे येथे वसलेल्या आणि असलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. १५०, १५१, प्लॉट क्र. ४८ जूना गट क्र. ३०५, प्लॉट क्र. ४८ वर बांधण्यात आलेल्या "देल्व्हन अपेक्स" म्हणून ज्ञात असलेल्या प्रकल्पामधील "वीनेसा अपार्टमेंट" म्हणून ज्ञात इमारतीच्या २ ऱ्या मजल्यावरील ५६५ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्रफळ असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ०९ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | |
| 5 | 4416210130000005 / 4416- कल्याण | **१. साहेबराव छगन गायकवाड, २. श्रीमती मीरा साहेबराव गायकवाड** दोघांचा पत्ताः येथे राहणारः घर क्र. ६६९, २६२, आंबेडकर नगर, ठाणे बेलापूर रोड, पोयषा कंपनी समोर, दिघा, नवी मुंबई ऐरोली महाराष्ट्र ४००७०८ दोघे येथे देखीलः सदनिका क्र. ११, २ रा मजला, सुंदरम कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (प्रस्तावित), "एकविरा कॉम्प्लेक्स" म्हणून ज्ञात कॉम्प्लेक्स, १५ सर्वे क्र. १६४ हिस्सा क्र. २+३/८, आणि सर्वे क्र. १६७, प्लॉट क्र.५ गाव नेरळ ता. कर्जत जिल्हा रायगड ४१०१०१ | ०५.१०.२०२३/ ०४.१०.२०२३ अनुसार रु. ९७६३४३.७५ | 04.02.2026 | Rs.9,08,000/- / Rs.90,800/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** महसुली गाव नेरळ, तालुका कर्जत जिल्हा रायगड येथे वसलेल्या सर्वे क्र. १५ सर्वे क्र. १६४ हिस्सा क्र. २+३/८, आणि सर्वे क्र. १६७, प्लॉट क्र.५ वरील "एकविरा कॉम्प्लेक्स" म्हणून ज्ञात असलेल्या सुंदरम कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (प्रस्तावित) म्हणून ज्ञात इमारतीच्या २ ऱ्या मजल्यावरील ६०५ चौ. फू. (बिल्टअप) क्षेत्रफळ असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ११ चा सर्व खंड आणि भूखंड. - | | | |
| 6 | 441676300000057 / 4416- कल्याण | **१. महेश पालकधारी विश्वकर्मा, २. उषा महेश विश्वकर्मा दोघांचा पत्ताः** खोली २०४, २रा मजला, शिवम अपार्टमेंट, माया गॅस एजन्सी जवळ, रेती बंदर रोड, पाईप लाईन क्र. १९० समोर, काल्हेर, ठाणे, महाराष्ट्र -४२१३०२ | ११.०८.२०२३/ ०८.०८.२०२३ अनुसार रु. २३,४१,२४६.४ | (पूर्वी २३-०९-२०२० रोजी ताबा घेण्यात आला होता आणि २९-०६-२०२६ रोजी पुन्हा ताबा घेण्यात आला आहे.) | Rs.11,55,000/- / Rs.1,15,500/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** गाव काल्हेर तालुका भिवंडी जिल्हा ठाणे, ग्रामपंचायत काल्हेरच्या हद्दीमधील सर्वे क्र. ९९, हिस्सा क्र. १ वर बांधण्यात आलेल्या "शिवम अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या बी विंगच्या २ ऱ्या मजल्यावरील ५५० चौ. फू. जे ५१.११ चौ. मी. शी समतुल्य मोजमाप असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. २०४ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | |

**मालमत्ता (मत्तां) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ :: ०१.१०.२०२६ ते १३.१०.२०२६ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान**
**बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक :: १६.१०.२०२६ रोजी स. ११:०० वा. ते सायं. ५.०० वा. पर्यंत**
**लिलावाचा दिनांक आणि वेळ :: १७.१०.२०२६ रोजी दु. २:०० ते सायं. ५:०० वा. दरम्यान**

**इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत),**
**बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाणः** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल झायका समोर, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१.
(संपर्क तपशीलः **अमोल जोशी - ७९००१२७५५५ चंद्र मोहन चौधन : ८१०८८३८२८६).**

**अटी आणि शर्ती :** ई- लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे.
१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधत्वि नाही आणि असणार नाही. मालमता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
४. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार **मे. 4 क्लोझर** यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्तीः विठ्ठल राठोड - (मो क्र ८१४२०००७२५). इच्छुक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions ला भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com ला भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छुक खरेदीदार यांना ई लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मे. 4 क्लोझर, हेल्प लाईन क्रमांक ८१४२०००६१/६२/६३६४ सपोर्ट ई मेल आयडी info@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://bankeauctions.com येथे देण्यात येईल.
५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा नर्णिय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
६. यशस्वी बोलीदार यांचे इरठे विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे इरठे परत देण्यात येईल. इरठे रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम इरठे समायोजित करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
७. सदर प्रसिद्धी सूचना अमलबजावणी होणाऱ्या मुद्द्यांना अनुसरून आहे.
८. बोलीदारांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत अशा घटना टाळण्यासाठी बोलीदारांना आवाहन करण्यात येते आहे की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे त्यांना लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेता येणे शक्य होईल.
ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

**ठिकाणः महाराष्ट्र, दिनांक : २५.०९.२०२६** — **सही/- प्राधिकृत अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनांस बँक**